महाराष्ट्र शासन
जिल्हादंडाधिकारी कार्यालय, जालना
प्रशासकीय इमारत, सर्वे नं.488, जालना

दूरध्वनी क्रमांक : 02482-225502

फॅक्स क्रमांक : 02482-225326

Additional District Magistrate, Jalna

जा.क्र.2020/आरबी-डेस्क-1/पोल-1/कावी-

दि.23.06.2020.

वाचा -१. या कार्यालयाचे आदेश क्र.२०२०/मशाका/जिनिका/आव्यप्र/कावी- दि.३१.०५.२०२०

२. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र.डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीएमयु-१ दि.३१.०५.२०२०

३. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग पत्र क्र.डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीएमयु-१ दि.२२.०६.२०२०

**आदेश** -

ज्याअर्थी, संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये जालना जिल्हयात कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोकण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन नागरीकांची एकाच ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ लागु करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, शासनाने संदर्भ क्र.२ अन्वये कोरोना विषाणूचा राज्यातील वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता लॉकडाऊन दरम्यान गर्दी टाळण्याच्या दृष्टीने केवळ ५० लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टंसिंग पाळत लग्न समारंभ साजरा करण्याची परवानगी संदर्भिय आदेशान्वये देण्यात आलेली आहे. तथापि, हे लग्न समारंभ कोणकोणत्या ठिकाणी पार पाडता येतील याबाबतचा उल्लेख सदर आदेशांमध्ये नाही. ५० लोकांच्या मर्यादेतच सोशल डिस्टंसिंग पाळून खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल / सभागृह येथे लग्न समारंभ पार पाडण्यास संदर्भ क्र.२ अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

शासन संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये व या कार्यालयाकडून कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशाचा भंग होणार नाही तसेच खालील अटी व शर्तीचे अधीन राहून जालना जिल्हयात ५० लोकांच्या मर्यादेतच सोशल डिस्टंसिंग पाळून खुले लॉन, विना वातानुकूलित मंगल कार्यालय / हॉल / सभागृह येथे लग्न समारंभ पार पाडण्यास संदर्भ क्र.२ अन्वये परवानगी देण्यात येत आहे.

१. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता लग्न समारंभात सहभागी व्यक्ती व इतर कामगारांना मास्क, हॅण्डग्लोज, सॅनिटायझर व इतर प्रतिबंधत्माक साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे.
२. सामाजिक अंतर (Social Distancing) ठेवून लग्न समारंभ पार पडत असल्याची खात्री मंगल कार्यालय च्या मालक / व्यवस्थापक यांनी करावी.
३. लग्न समारंभाची पुर्व सुचना मंगल कार्यालय च्या मालक / व्यवस्थापक यांनी जवळचे पोलीस ठाणे यांना किमान ३ दिवस अगोदर दयावी.
४. मंगल कार्यालयाच्या प्रथमदर्शनी व सर्वांना दिसेल अशा ठिकाणी कोरोना विषाणूची संसर्गाबाबत व आरोग्य विषयक माहिती व मार्गदर्शक सुचना त्यांचे मातृभाषेत स्पष्टपणे अवगत करण्यात याव्यात तसेच या सूचनांचे पालन होत आहे, यांची खातरजमा करावी.

वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढिल कार्यवाही करण्यात येईल.

स्वा/-
(निवृत्ती गायकवाड)
अपर जिल्हादंडाधिकारी, जालना

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव-**

१. पोलीस अधिक्षक, जालना
२. उपविभागीय अधिकारी, जालना / भोकरदन / परतूर / अंबड.
३. तहसिलदार, जालना / बदनापूर / भोकरदन / जाफ्राबाद / परतूर / मंठा / अंबड / घनसांवगी.

(निवृत्ती गायकवाड)
अपर जिल्हादंडाधिकारी, जालना

Scanned by CamScanner